माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

## क्र. मुमाआ/नों.क्र.८०८१/२१/अ.क्र.१२९२/२५/०१

**श्री. प्रकाश पाटेकर**
बी-३/६, भाद्रण नगर, एन.एल. कॉलेजच्या मागे,
एस.व्ही. रोड, मालाड (प.) मुंबई-४०००६४

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि) के/पश्चिम विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त
के/पश्चिम विभाग यांचे कार्यालय, दुसरा मजला, बी.ई.एस.टी.डेपोसमोर,
पालीराम पथ, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता के/पश्चिम विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त
के/पश्चिम विभाग यांचे कार्यालय, दुसरा मजला, बी.ई.एस.टी.डेपोसमोर,
पालीराम पथ, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १८.०६.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २४.११.२०२० | १०.१२.२०२० | - | १६.०२.२०२१ |

अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२४.११.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "विभागाद्वारे करण्यात आलेल्या Tranches च्या कामाच्या" माहितीची मागणी केलेली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि.१०.१२.२०२० "जोडपत्र अ मध्ये मागणी केलेली माहिती ही मोगम स्वरूपाची असून त्यासाठी कार्यालयाचा अतिरिक्त वेळ व यंत्रणा कामास लावावी लागेल जेणेकरून कामाचे नुकसान होईल", असे उत्तरान्वये कळविले आहे.

अपीलार्थी यांनी दि.निरंक रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराने संतूष्ट नाही", असे कारण नमूद करुन प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर दि.१६.०२.२०२१ रोजी "जन माहिती अधिकारी यांनी पुढील १५ दिवसाच्या आत अपिलकर्त्यास निरीक्षणाची संधी देऊन उपलब्ध हवी असलेली माहिती विहित शुल्क आकारुन द्यावी" असे आदेश पारित करुन प्रथम अपिल निकाली काढण्यात आले.

अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे दि.१३.०७.२०२१ रोजी "माहितीचे निरीक्षण किंवा माहितीसाठी लागणारे शुल्काचे चलन दिले नाही", असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपीलावर आज दि.१८.०६.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि) के/ पश्चिम विभाग व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता के/पश्चिम विभाग यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सुचना न देता अनुपस्थित आहेत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी यांना जोडपत्र अ मध्ये नमूद केलेली माहिती प्राप्त करता येण्याच्या अनुषंगाने विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियेता (परि) के/पश्चिम विभाग यांनी अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करून घेण्यास स्वारस्य असल्यास कार्यालयाच्या अभिलेखाचे अवलोकन करण्याची अंतिम संधी निर्देश प्रदान करून उपरोक्त माहिती सशुल्क द्यावी. सदर माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध असेल तर अपिलार्थी यांना त्यांच्या ई-मेल द्वारे विनामूल्य प्रदान करावी. प्रस्तुत अपिल निकाली काढून नस्तीबंद करण्यात येत आहे.

**आदेश**

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १८.०६.२०२५**

State Information Commission * Maharashtra *